# वसई - विरार शहर महानगरपालिका

## प्रभाग समिती (बी), सार्व. बांधकाम विभाग (उद्यान विभाग)

### जाहीर निविदा सूचना क्र.

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील खाली उल्लेख केल्याप्रमाणे विकास कामे करणेसाठी शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडे योग्य त्या वर्गात नोंदणीकृत ठेकेदारांकडून बी.-१ नमुन्यात द्विलखोटा पध्दतीनुसार महानगरपालिकेच्या अटी व शर्तीस अधिन राहून मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. सदर कामाचे कोरे निविदा फॉर्म दि. 22/03/2018 ते दि. 02/04/2018 पर्यंत दुपारी. ३.०० वाजेपर्यंत सुट्टीचे दिवसाखेरीज महानगरपालिकेच्या कार्यालयीन कामकाजाचे वेळेत रोखीने विकत मिळतील. सदर कामांची इसारा रक्कम आयुक्त वसई विरार शहर महानगरपालिका या नावे देय असलेल्या डिमांड ड्राफ्टद्वारे भरावी लागेल व सदर डिमांड ड्राफ्ट निविदेसोबत जोडावा लागेल डिमांड ड्राफ्टद्वारे इसारा न भरलेल्या, खाडाखोड केलेल्या, मुदतीत न आलेल्या व सशर्त निविदा नाकारण्यात येतील. सदर कामी पूर्णपणे भरलेल्या मोहोरबंद निविदा दि. 03/04/2018 रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत महानगरपालिकेच्या उद्यान विभाग, प्रभाग समिती (बी) नालासोपारा या कार्यालयात ठेवलेल्या सिलबंद निविदा पेटीत टाकण्यात याव्यात. प्राप्त निविदा या उद्यान विभाग, प्रभाग समिती (बी), नालासोपारा येथे हजर निविदा धारक अथवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष त्याच दिवशी दुपारी ४.०० वा. प्रथम तांत्रिक बोलीचा लिफाफा क्र. १ उघडण्यात येईल. लिफाफा क्र. १ मध्ये सविस्तर निविदा सुचनेमध्ये दर्शविल्यानुसार कागदपत्रे असल्यास वित्तीय बोलीचा लिफाफा क्र. २ उघडण्यात येईल. याकामी आलेल्या निविदांपैकी कोणतीही एक निविदा स्विकारण्याचा अथवा आलेल्या सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | निविदा फॉर्म फी | सुरक्षा अनामत | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | विरार (पू) प्रभाग क्र. २७ मधील उद्यानातील विविध अनुषंगीक कामे करणे. | रू. २,८९,१५२/- | रू. ३,०००/- | रू. २००/- + १२% जी.एस.टी. | २% डी.डी.ने व २ % बिलातून | ६० दिवस |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | विरार (पू) प्रभाग क्र. ३० मधील उद्यानातील विविध अनुषंगीक कामे करणे. | रु. २,८७,४७३/- | रु. ३,०००/- | रु. २००/- + १२% जी.एस.टी. | २% डी.डी.ने व २ % बिलातून | ६० दिवस |
| ३ | विरार (पू) प्रभाग क्र. २७,३० व ३७ मधील उद्यानातील विविध अनुषंगीक कामे करणे. | रु. २,८७,०६५ /- | रु. ३,०००/- | रु. २००/- + १२% जी.एस.टी. | २% डी.डी.ने व २ % बिलातून | ६० दिवस |

अटी - १) कोरे निविदा फॉर्मची मागणी करते वेळी अर्जासोबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

२) ज्या ठेकेदाराचे नावे कामाचे नोंदणी प्रमाणपत्रक आहे. त्यांनी मुळ कागदपत्रासह स्वत: अगर अधिकृत प्रतिनिधीं मार्फत कोरे निविदा फार्म घेवून जाणे आवश्यक आहे.

३) सदरहून कामांच्या निविदा द्वि लखोटा पध्दतीचा अवलंब करावयाचा आहे.

४) निविदाधारकांनी सादर केलेल्या तांत्रिक बोलीचा लिफाफा क्र.१ मध्ये (I) सार्वजनीक बांधकाम विभागाच्या नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत, (II) इसारा रक्कमेचा धनाकर्ष, (III) महानगरपालिकेकडून देयकाचे प्रदान अपेक्षित असलेल्या बॅक खाते क्रमांकाची बॅंकेच्या नावासह यादी असणारे विवरणपत्र किंवा बॅंक खाते IV) जी.एस.टी.रजिस्ट्रेशन पुस्तकांच्या वरील पृष्ठाची छायांकित प्रत सादर करणे आवश्यक आहे. सदरची कागदपत्रे लिफाफा क्र.१ मध्ये नसतील तर निविदा बोलीचा लिफाफा क्र.२ उघडला जाणार नाही.

५) सदर कामाबाबत निविदाधरकांकडून तीन पेक्षा कमी निविदा प्राप्त झाल्यास फेरनिविदा मागविण्यात येतील. तसेच कोणत्याही कारणाशिवाय निविदा नाकारण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवला आहे.

६) प्राप्त निम्नतम फेर निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा १० % पर्यंत कमी दरांचा असेल अशा ठेकेदारांनी निविदाधीन किंमतीच्या १% एवढ्या रक्कमेचा धनाकर्ष (Demand Draft) परफॉर्मन्स सिक्युरिटी म्हणून निविदेच्या लिफाफा क्र.२ मध्ये सादर करावा. (उदा.१ % ते १० % कमी दर - १ % रक्कम)

७) प्राप्त निम्नतम निविदेचा कामाच्या किंमतीपेक्षा १० % पेक्षा जास्त दराने कमी असेल तर देकार १० % पेक्षा जेवढ्या जास्त दराने कमी आहे. तेवढ्या रक्कमेचा व वरील बाब - ८ प्रमाणे येणा-या रक्कमेसह एकत्रित धनाकर्ष (Demand Draft) निविदेसोबत लिफाफा क्र.२ मध्ये सादर करावा. (उदा.१४ % कमी दर - १० % पर्यत करिता - १ % टक्का व (१० % ते १४ %) - ४% असे एकूण ५ %)

८) धनाकर्ष उपलब्ध करुन देणे/ धनाकर्ष परत करणे व इतर बाबींबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करावी :-

अ) धनाकर्षावर बॅकेचा MICR व IFSC कोड नंबर असणे आवश्यक आहे.) धनाकर्ष आयुक्त, वसई - विरार शहर महानगरपालिका यांच्या नावे असावा.

ब) धनाकर्ष सरकारी बॅका किंवा शेड्युल्ड बॅकांकडून काढलेला असावा.

क) वरील पध्दतीमध्ये खोटी कागदपत्रे/धनाकर्ष सादर करणा-या कंत्राटदारांची अनामत रक्कम (EMD) जप्त करण्यात येईल.

९) निविदा बाबत अधिक माहितीसाठी प्रभाग समिती (बी) च्या बांधकाम विभागाशी संपर्क साधावा.

१०) सदरची निविदा GST चा कर विचारात घेऊन भरणा करावे.

जा.क्र. : वविशम/नासो/ बांध/ ११०९ /२०१७-१८

दिनांक : १५/3/2018

| सही/- | सही/- | सही/- | सही/- |
|---|---|---|---|
| शाखा अभियंता | सहा. आयुक्त | अतिरीक्त आयुक्त | सभापती |
| प्रभाग समिती (बी) | प्रभाग समिती (बी) | वसई- विरार शहर महानगरपालिका | प्रभाग समिती (बी) |
| वसई- विरार शहर महानगरपालिका | वसई- विरार शहर महानगरपालिका | | वसई- विरार शहर महानगरपालिका |